# नवी मुंबई महानगरपालिका

**प्रसिध्दीकरिता**

दि. 05 / 5 / 2020

**● कोव्हीड - 19 नियंत्रण कक्ष ●**

**टोल फ्री क्रमांक :- 1800222309 / 1800222310    हेल्पलाईन क्रमांक :- 022 - 27567060/61**

**फेसबुक :- @NMMConline    ट्विटर :- @NMMConline**

---

**कोव्हीड - 19 प्रादुर्भाव प्रतिबंधासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने**
**तातडीने करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने अहवाल**

**कोव्हीड - 19 : सांख्यिकी तपशील (दि. 05/05/2020 रोजी, दुपारी 4 वा.पर्यंत अद्ययावत)**

| | |
|---|---|
| ● कोव्हीड - 19 चाचणी केलेल्या नागरिकांची संख्या | 4702 |
| आज पॉझिटिव्ह | 47 |
| एकूण पॉझिटिव्ह | 395 |
| आज निगेटिव्ह | 278 |
| एकूण निगेटिव्ह | 3228 |
| तपासणी अहवाल प्रलंबित | 1126 |
| ● आज पॉझिटिव्ह ते निगेटिव्ह झालेल्या व्यक्ती | 01 |
| ● एकूण पॉझिटिव्ह ते निगेटिव्ह झालेल्या व्यक्ती | 49 |
| ● सेक्टर 14, वाशी + कोव्हीड केअर सेंटर येथील नागरिक संख्या | 87 |
| ● इंडिया बुल्स, पनवेल - कोव्हीड केअर सेंटर येथील नागरिक संख्या | 711 |
| ● घरीच क्वारंटाईन असलेल्या व्यक्तींची संख्या | 6348 |
| ● क्वारंटाईन कालावधी पूर्ण संख्या | 4309 |
| ● कोव्हीड - 19 विशेष रूग्णालय (सार्व.रूग्णा.,वाशी) येथे दाखल | 27 |
| ● कोव्हीड -19 मुळे मृत्यू संख्या | 07 |
| ● कन्टेनमेन्ट क्षेत्र | 91 |

## कोव्हिड - 19 आजचे अपडेट (05/05/2020)

● **आज 325 कोरोना टेस्ट रिपोर्ट प्राप्त** झाले. त्यामध्ये **278 रिपोर्ट निगेटिव्ह आणि 47 रिपोर्ट पॉझिटिव्ह** प्राप्त.

● **आज पॉझिटिव्ह नोंदीत रूग्ण संख्या - 47**    ● **एकूण पॉझिटिव्ह नोंदीत रूग्ण संख्या - 395**

● **विभागनिहाय कोरोना पॉझिटिव्ह नोंदीत संख्या : नेरूळ - 14, वाशी - 7, तुर्भे - 5, कोपरखैरणे - 07, घणसोली - 8, ऐरोली - 4, दिघा - 2.**

● सेक्टर 14 कोपरखैरणे येथील रहिवाशी असणा-या 35 वर्षीय व्यक्तीचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झाले आहेत. त्यांना 2 मे रोजी श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने त्यांनी स्वॅब टेस्ट करून घेतली असता त्यांचे रिपोर्ट पॉझिटिव्ह आलेले आहेत.

● सेक्टर 5 कोपरखैरणे येथील रहिवाशी व ए.पी.एम.सी. भाजी मार्केटमधील 57 वर्षीय व्यापारी व त्यांची 47 वर्षीय पत्नी अशा 2 व्यक्तींचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत. त्यांना ताप येऊ लागल्यांने त्यांची स्वॅब टेस्ट केली असता रिपोर्ट पॉझिटिव्ह आलेले आहेत.

● सेक्टर 10 ए वाशी येथील रहिवाशी असलेल्या मुंबई येथील रे रोड याठिकाणी ग्रोसरी शॉप असणा-या पॉझिटिव्ह व्यक्तीच्या निकटच्या संपर्कातील व्यक्तींच्या स्वॅब तपासणीमधून त्यांच्या 61 वर्षीय पत्नी, 28 वर्षीय सून, 32 वर्षीय मुलगा, 22 वर्षीय पुतण्या व 3 वर्षाची नात अशा 5 व्यक्तींचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● सेक्टर 5 सानपाडा येथील 35 वर्षीय पती व 28 वर्षीय पत्नी अशा 2 व्यक्तींचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झाले आहेत. 29 एप्रिल रोजी पतीला ताप येऊ लागल्याने या दोघांनी स्वॅब टेस्ट करून घेतली असता रिपोर्ट पॉझिटिव्ह आलेले आहेत.

● सेक्टर 4 सानपाडा येथील रहिवाशी व ट्रॉम्बे पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत कोरोना पॉझिटिव्ह पोलीस कॉन्स्टेबल यांच्या निकटच्या संपर्कातील व्यक्तींच्या स्वॅब तपासणीमधून त्यांच्या 13 वर्षीय पुतण्याचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● सेक्टर 5 सानपाडा येथील रहिवाशी व मुंबईतील हिंदूजा रुग्णालयामध्ये वॉर्डबॉय म्हणून कार्यरत असणा-या 25 वर्षीय व्यक्तीचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत. 30 एप्रिल रोजी ताप येईपर्यंत ते कामाला जात होते. त्यांची स्वॅब टेस्ट केली असता रिपोर्ट पॉझिटिव्ह आलेला आहे.

● बाली नगर दिघा येथील रहिवाशी व ए.पी.एम.सी. भाजी मार्केट येथे कॅश काऊंटर वर कार्यरत असणा-या 42 वर्षीय व्यक्तीचे युवकाचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● समता नगर ऐरोली येथे रहिवाशी असणा-या व सायन हॉस्पिटल मुंबई येथे आया पदावर काम करणा-या कोरोना पॉझिटिव्ह महिलेच्या निकटच्या संपर्कातील व्यक्तींच्या स्वॅब तपासणीमधून त्यांच्या शेजारी 22 वर्षीय महिलेचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● गणेश नगर चिंचपाडा ऐरोली येथील रहिवाशी व डिव्हाईन हॉस्पिटल ठाणे येथील 51 वर्षीय वॉर्डबॉय यांचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह आलेले आहेत. कोरोना बाधीत रुग्णाच्या संपर्कात आल्याने व 1 मे रोजी ताप येऊ लागल्याने त्यांनी स्वॅब टेस्ट केली असता रिपोर्ट पॉझिटिव्ह आलेला आहे.

● चिंचपाडा ऐरोली येथील रहिवाशी व मुलुंड मुंबई येथे रुग्णवाहिका चालविणा-या 49 वर्षीय चालकाचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● सेक्टर 15 नेरुळ येथील रहिवाशी असणा-या व मुंबईतील वृत्तचित्रवाहिनी पॉझिटिव्ह कॅमेरामनच्या संपर्कात आलेल्या पॉझिटिव्ह कॅमेरामनच्या निकटच्या संपर्कातील व्यक्तींच्या स्वॅब तपासणीमधून त्यांच्या 65 वर्षीय आईचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह आलेले आहेत.

● सेक्टर 28 वाशी येथील रहिवाशी व ए.पी.एम.सी. दाणा मार्केट येथील 60 वर्षीय ब्रोकर यांचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत. नवी मुंबई महानगरपालिकेच्या ए.पी.एम.सी. मार्केटमधील कोरोना तपासणी कक्षात लक्षणे आढळल्याने त्यांची स्वॅब टेस्ट करून घेण्यात आलेली होती.

● कोपरीगांव तुर्भे येथील रहिवाशी असणा-या 22 वर्षीय व्यक्तीचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● सेक्टर 26 वाशी येथील रहिवाशी व ए.पी.एम.सी. दाणा मार्केटमधील पॉझिटिव्ह सेल्समनच्या निकटच्या संपर्कातील व्यक्तींच्या स्वॅब तपासणीमधून त्यांच्या 60 वर्षीय वडिलांचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● सेक्टर 5 घणसोली येथील रहिवाशी व मुंबई गोरेगांव येथील महानंदा डेरीत कार्यरत पॉझिटिव्ह व्यक्तीच्या निकटच्या संपर्कातील व्यक्तींच्या स्वॅब तपासणीमधून त्यांच्या 39 वर्षीय पत्नी, 13 वर्षीय मुलगा व मुलगी, 78 वर्षीय वडील आणि 67 वर्षीय आई अशा 5 व्यक्तींचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● सेक्टर 5 घणसोली येथील रहिवाशी 55 वर्षीय महिलेचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत. त्यांच्यावर डायरियाचे उपचार सुरु असताना त्यांची स्वॅब टेस्ट केली असता त्यांचे रिपोर्ट पॉझिटिव्ह आलेले आहेत.

● सेक्टर 3 घणसोली येथील रहिवाशी 36 वर्षीय गरोदर महिला नियमित तपासणीसाठी रुग्णालयात गेली असता तिची स्वॅब टेस्ट करण्यात आली त्यामध्ये सदर महिलेचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● घणसोली चिंचआळी येथील 45 वर्षीय महिलेस 3 मे रोजी ताप व कफ अशी लक्षणे आढळल्याने स्वॅब टेस्ट करून घेतली असता कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● सेक्टर 11 कोपरखैरणे येथील ए.पी.एम.सी. दाणा मार्केटमधील पॉझिटिव्ह अकाऊंटंटच्या निकटच्या संपर्कातील व्यक्तींच्या स्वॅब तपासणीमधून त्यांच्या 55 वर्षीय वडीलांचे, 50 वर्षीय आईचे, 31 वर्षीय पत्नीचे व 24 वर्षीय बहिणीचे अशा 4 व्यक्तींचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● सेक्टर 6 सारसोळे नेरूळ येथील रहिवाशी व मुंबईत बी.पी.टी. फोर्ट येथील 55 वर्षीय कर्मचारी यांचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह आलेले आहेत.

● सेक्टर 24 जुईनगर नेरूळ येथील पॉझिटव्ह मृत व्यक्तीच्या निकटच्या संपर्कातील व्यक्तींच्या स्वॅब तपासणीमधून त्यांच्या52 वर्षीय पत्नी, 21 व 24 वर्षीय 2 मुली आणि 15 वर्षीय मुलगा तसेच 31 शेजारी पुरूष व 29 वर्षीय शेजारी महिला अशा 6 व्यक्तींचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● सेक्टर 06 शिरवणे नेरूळ येथील रहिवाशी व मुंबईतील पॉझिटिव्ह पोलीस कॉन्टेबलच्या निकटच्या संपर्कातील व्यक्तींच्या स्वॅब तपासणीमधून त्यांच्या 25 वर्षीय मुलाचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● सेक्टर 23 जुईनगर येथील रहिवाशी व ए.पी.एम.सी. भाजी मार्केटमध्ये कामगार असणा-या 35 वर्षीय व्यक्तीचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● सेक्टर 23 जुईनगर येथील रहिवाशी व मुंबईतील चेंबूर नाका पोलीस ठाणे येथे कार्यरत 48 वर्षीय पोलीस कॉन्स्टेबल आणि त्यांचा 18 वर्षाचा मुलगा अशा 2 व्यक्तींचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत. त्यांना जॉय हॉस्पिटल चेंबूर येथे उपचारार्थ दाखल करण्यात आलेले आहे.

● सेक्टर 24 जुईनगर येथील रहिवाशी व मुंबई येथे बी.ई.एस.टी. कुलाबा डेपोत इलेक्ट्रीशियन म्हणून कार्यरत असणा-या 56 वर्षीय व्यक्तीचे व त्यांच्या 22 वर्षीय मुलगा अशा 2 व्यक्तींचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● सेक्टर 20 ऐरोली येथील पॉझिटिव्ह महिलेच्या डेडीकेटेड कोव्हीड हॉस्पिटल वाशी याठिकाणी झालेल्या प्रसुतीनंतर तिच्या बाळाची स्वॅब टेस्ट घेतली असता तिचे कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झालेले आहेत.

● रामनगर दिघा येथील रहिवाशी व मुंबईतील ग्रँटरोड येथील कार्यालयात संगणक ऑपरेटर असणा-या व्यक्तीस 1 मे रोजी श्वासोच्छवासाचा त्रास सुरू झाल्याने दिघा येथील खाजगी रुग्णालयात उपचार घेत असताना त्यांचा मधुमेह वाढल्याने त्यांस ठाण्यातील रुग्णालयात हलविण्यात आले. त्याठिकाणी त्यांची कोरोना टेस्ट केली असता कोरोना टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह प्राप्त झाल्याने त्यांना 4 मे रोजी रात्री 12 वाजता ठाण्यातील सिव्हील रुग्णालयात हलविण्यात आले व ते 5 मे रोजी पहाटेच्या सुमारास त्यांचे निधन झाले.

**अतिरिक्त आयुक्त (१)**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**बेघर, निराधार, मजूर, विस्थापित कामगार, गरजू नागरिकांना मदतकार्य (दि. 05/05/2020)**

- विभागवार निवारा केंद्र एकूण संख्या :- 18 + 1 (सिडको एक्झि.सेंटर)
- सद्यस्थितीत कार्यान्वित निवारा केंद्र संख्या :- 05 + 1 (सिडको एक्झि.सेंटर)
- निवारा केंद्रातील एकूण नागरिक संख्या :- **333**
- नमुंमपा शाळा क्र. 01, बेलापूर निवारा केंद्र नागरिक संख्या :- 32
- नमुंमपा निवारा केंद्र, आग्रोळी, से.11, बेलापूर निवारा केंद्र नागरिक संख्या :- 25
- नमुंमपा शाळा क्र. 12, से. 6, सारसोळे, नेरूळ निवारा केंद्र नागरिक संख्या :- 13
- नमुंमपा निवारा केंद्र, घणसोली निवारा केंद्र नागरिक संख्या :- 26
- नमुंमपा शाळा क्र. 103, से. 14, ऐरोली निवारा केंद्र नागरिक संख्या :- 05
- सिडको एक्झिबिशन सेंटर, से.30, वाशी निवारा केंद्र नागरिक संख्या :- 232
- सद्यस्थितीत कार्यान्वित **सहा निवारा केंद्रात असलेल्या 333 व्यक्तींना अल्पोपहार, चहा आणि सकाळचे व दुपारचे जेवण महानगरपालिकेने स्थापित केलेल्या कम्युनिटी किचनव्दारे दिले जात आहे.**
- याशिवाय कोव्हीड -19 आपत्ती व्यवस्थापन केंद्राच्या नियंत्रण कक्षातील टोल फ्री क्रमांकावर तसेच विभाग कार्यालयांमध्ये आलेल्या मागणीनुसार महानगरपालिका क्षेत्रातील **गरजू मजूर, कामगार, विस्थापित कामगार, बेघर नागरिक, काळजी घेण्यास कोणी नसलेल्या दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक अशा 42160 व्यक्तींना आज महानगरपालिकेचे 15 कम्युनिटी किचन तसेच स्वयंसेवी संस्था, दानशूर व्यक्ती यांच्या सहयोगाने जेवण दिले गेले आहे.**
- महानगरपालिकेच्या वतीने 8 विभागांमध्ये 18 ठिकाणी निवारा केंद्रांचे विभागवार नियोजन करण्यात आले असून 1850 व्यक्तींच्या निवा-याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.
- **या निवारा केंद्रातील तसेच महापालिका क्षेत्रातील नागरिकांना अल्पोपहार व जेवण पुरविण्यासाठी 15 कम्युनिटी किचनव्दारे भोजन पुरवठा करण्यात येत आहे**.

# प्रसिध्दीपत्रक

## नवी मुंबई महानगरपालिका

दि. 05 मे 2020

**कोव्हीड केअर सेंटरसाठी सिडको एक्झिबिकेशन सेंटरची आयुक्त श्री. अण्णासाहेब मिसाळ यांनी केली पाहणी**

**तेरणा हॉस्पिटल येथे 100 बेड्सचे डेडीकेटेड कोव्हीड हॉस्पिटलचे नियोजन**

**रिलायन्स ऑक्युपेशनल हेल्थ सेंटरमध्ये 60 बेड्सचे कोव्हीड केअर सेंटर कार्यान्वित**



नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कोरोना बाधितांची वाढती संख्या लक्षात घेऊन त्यांच्यावरील उपचाराकरिता वैद्यकीय व्यवस्थेचे सुयोग्य नियोजन करण्याच्या दृष्टीने महापालिका आयुक्त श्री. अण्णासाहेब मिसाळ यांनी विभागप्रमुखांची तातडीने बैठक घेत आवश्यक उपाययोजनांच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा केली.

यामध्ये केंद्रीय कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कोव्हीड केअर सेंटर (CCC), डेडीकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर (DCHC), डेडीकेटेड कोव्हीड हॉस्पिटल (DCH) अशाप्रकारे तयार करण्यात आलेल्या त्रिस्तरीय रुग्णालय व्यवस्थापनाचा सविस्तर आढावा घेत त्यामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना करण्यासाठी त्यांनी निर्देश दिले.

या अनुषंगाने वाशी येथील सिडको एक्झिबिकेशन सेंटर याठिकाणी कोव्हीड केअर सेंटर (CCC) सुरु करण्याच्या अनुषंगाने आयुक्त श्री. अण्णासाहेब मिसाळ यांनी शहर अभियंता श्री. सुरेंद्र पाटील व उपआयुक्त श्री. अमरिश पटनिगिरे यांच्यासह प्रत्यक्ष भेट देऊन जागेची पाहणी केली व त्याठिकाणी कोव्हीड केअर सेंटर सुरु करणयाच्या दृष्टीने आवश्यक व्यवस्था करण्याचे निर्देश दिले. त्याठिकाणी अंदाजे 1200 बेड्सची व्यवस्था करण्यात येणार असून तेथे दोन स्वतंत्र कक्ष असणार आहेत. यामधील एका कक्षात स्वॅब सॅम्पल टेस्ट रिपोर्ट पॉझिटिव्ह आलेल्या व सौम्य स्वरुपाची लक्षणे असलेल्या कोव्हिड - 19 बाधीतांवर स्वतंत्रपणे उपचार करण्यात येणार आहेत तसेच दुस-या स्वतंत्र कक्षात कोरोना पॉझिटिव्ह नागरिकाच्या संपर्कात आल्यामुळे क्वारंटाईन केलेल्या संशयित नागरिकांना ठेवण्यात येणार आहे. याठिकाणी आवश्यक असलेल्या स्नानगृहे व स्वच्छतागृहांची व्यवस्था मॉड्युलर स्वरुपात त्वरित करण्याचे निर्देश आयुक्तांनी अभियांत्रिकी विभागाला दिले.

त्याचप्रमाणे घणसोली येथील रिलायन्स कॉर्पोरेट आय.टी. पार्कमध्ये मेडिकल अॅण्ड ऑक्युपेशनल हेल्थ सेंटर या ठिकाणीही कोव्हीड केअर सेंटर (CCC) करिता 120 बेड्स असणार असून त्यामधील 60 बेड्स महानगरपालिका संदर्भित कोरोना संदर्भिय व्यक्तींसाठी राखीव असणार आहेत. येथे महानगरपालिकेमार्फत कामकाज नियंत्रणासाठी नोडल ऑफिसर म्हणून डॉ. वरुण घिलडियाल यांची नियुक्ती महापालिका आयुक्त यांनी केली आहे.

तसेच सद्यस्थितीत वाशी सार्वजनिक रुग्णालयात 130 बेड्सचे डेडीकेटेड कोव्हीड हॉस्पिटल (DCH) कार्यान्वित असून महापालिका आयुक्त श्री. अण्णासाहेब मिसाळ यांनी सेक्टर 22 नेरुळ येथील तेरणा हॉस्पिटलमध्ये पहिल्या टप्प्यात 100 बेड्सचे डेडीकेटेड कोव्हीड हॉस्पिटल (DCH) सुरु करण्यात येत असल्याचे जाहीर केले आहे.याठिकाणी महानगरपालिकेमार्फत नियंत्रणासाठी नोडल ऑफिसर म्हणून डॉ.रुषिभा जैन यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कोव्हीड 19 नियंत्रणासाठी विविध उपाययोजना केल्या जात असताना कोरोना बाधीत व्यक्तींवर सुयोग्य उपचार व्हावेत व कोणताही रूग्ण वैद्यकीय उपचारांशिवाय राहू नये याकरिता वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत आयुक्त तातडीने निर्णय घेत असून त्याची अंमलबजावणी करण्याकडेही काटेकोर लक्ष दिले जात आहे.

तरी नागरिकांनी कोरोनाचा प्रसार रोखून आपले नवी मुंबई शहर कोरोना मुक्त करण्यासाठी लॉकडाऊनच्या नियमांचे पालन करावे व घरातच थांबावे आणि कोरोनाची संसर्गाव्दारे वाढणारी साखळी खंडीत करावी असे आवाहन महापालिका आयुक्त श्री. अण्णासाहेब मिसाळ यांच्या वतीने करण्यात येत आहे.